**स्थायी निदेश क्र:-१४ - २०२४**

**स्वच्छ भारत अभियान अंतर्गत व वैशिष्टयपूर्ण प्रकल्प राबवणाऱ्या राज्यस्तरावर गुणानुक्रमे आलेल्या /नगरपरिषदा/नगरपंचायत/ महानगरपालिका/नगरपंचायत परिषदांनमधील पदाधिकारी यांनी भेटी देण्याबाबतचे धोरण.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका इमारत,**
**७ मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी.बेलापूर मुंबई ४००६१४**
**क्र.नपप्रस/प्र.क्र.१२८/स्थायी नि.१४/२०२४/स्वच्छ भा.अ.वै.गुणा.महा.नप.पदा.भेट./कक्ष-१२/६५५८**
**दिनांक -:** 15 OCT 2024

**प्रस्तावना: —**

राज्यातील महानगरपालिका व नगरपरिषदांमध्ये वैशिष्टयपूर्ण उपक्रम राबविले जातात. यशस्वी उपक्रमाची माहीती इतर नगरपरिषदांना मिळाल्यास नगरपरिषदांना त्या अनुभवाचा फायदा होईल. असे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविलेल्या तसेच स्वच्छ भारत अभियानांतर्गत उच्च गुणानुक्रमाणे आलेल्या तसेच वैशिष्टयपूर्ण उपक्रम राबवीत असलेल्या महानगरपालिका व नगरपरिषदांना राज्यातील इतर नगरपरिषदामधील पदाधिकारी यांनी भेटी देण्याबाबतचे धोरण खालील प्रमाणे विहित करण्यात येत आहे.

**आदेश:-**

१. राज्य स्तरावर स्वच्छ भारत अभियानाच्या अंतर्गत उच्च गुणानुक्रमे आलेल्या त्याचप्रमाणे विभागीय स्तरावर उच्च गुणानुक्रमे आलेल्या किंवा एखादया योजनेसंदर्भात वैशिष्टयपूर्ण काम झाले बाबत शासन किंवा संचालनालय स्तरावरून नोंद घेण्यात आली असल्यास अशा स्थानिक नागरी स्वराज्य संस्थांच्या प्रकल्पाचा अभ्यास करण्यासाठी नगरपरिषद सदस्य यांना खालील अटी व शर्ती पालन करून भेटी देता येतील.
२. भेट द्यावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्था- राज्यातील स्थानिक नागरी स्वराज्य संस्थेची अभ्यास दौऱ्यासाठी निवड करताना खालील बाबी विचारात घेण्यात याव्यात.

**अ.** अभ्यास दौऱ्यासाठी अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद असणे आवश्यक राहील.

**ब.** अभ्यास दौरा आयोजित करणाऱ्या संबंधित नगरपरिषदेत पुढील दोन ते तीन वर्षात हाती घ्यावयाच्या योजना व त्यामध्ये येणाऱ्या अडचणींचा विचार करावा व त्यानंतर ज्या नागरी स्थानिक संस्थांमध्ये असे

प्रकल्प यशस्वीरित्या राबविले जात आहे अश्या नागरी स्थानिक संस्थांना भेटी देण्याचा निर्णय नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये घेण्यात यावा.

**क.** एका आर्थिक वर्षामध्ये एकच अभ्यास दौरा करता येईल. या दौऱ्यात मागील तीन वर्षात राज्यस्तरावर स्वच्छ भारत अभियानाच्या अंतर्गत उच्च गुणानुक्रम मिळविणाऱ्या जास्तीत जास्त ३ विभागातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना भेटी देता येतील. याशिवाय संबंधित विभागातील विभागीय पातळीवर बक्षिस मिळालेल्या नागरी स्थानिक संस्थांनाही भेटी देता येतील.

**ड.** एकदा भेट दिल्यानंतर पुन्हा त्याच विभागातील नागरी स्थानिक स्वराज संस्थेस पुढील आर्थिक वर्षात भेट देता येणार नाही.

## ३. अभ्यास गटाची रचना व दौरा नियोजन -

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अभ्यास गटाची रचना व दौऱ्याचे नियोजन खालीलप्रमाणे करण्यात यावे.

**अ.** अभ्यास दौऱ्यासाठी सदस्यांच्या संख्येइतकी आसन क्षमता असलेले फक्त एक वाहन (बस) किमान दराने भाड्याने घेणे अनुज्ञेय राहील. एकूण अभ्यास गटाची सदस्य संख्या ही वाहनाची आसन क्षमता विचारात घेऊन ठरविण्यात यावी. अभ्यास गटामध्ये नगरपरिषद अध्यक्ष व काही सदस्य, मुख्याधिकारी व प्रकल्पाशी संबंधित विभाग प्रमुख किंवा कर्मचारी यांचा समावेश (आवश्यक) राहील.

**ब.** अभ्यास दौऱ्याचा एकूण कालावधी सात दिवस व अपवादात्मक परिस्थितीमध्ये दहा दिवसांपेक्षा जास्त नसावा.

**क.** भेट देण्यात येणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची किमान १० दिवस अगोदर पत्राने पूर्वसहमति घेणे आवश्यक राहील.

**ड.** अभ्यास दौऱ्याच्या कालावधीमध्ये नगरपरिषदेमध्ये अत्यावश्यक सेवेबाबत व आपत्कालीन सेवेची अडचण येणार नाही यासाठी योग्य ती उपाययोजना करण्याची जबाबदारी अध्यक्ष व मुख्याधिकारी यांची राहील.

**इ.** अभ्यास दौऱ्यातील सदस्यांना प्रवास भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

**फ.** अभ्यास दौऱ्यामधील दैनिक खर्च हा नगरपरिषद सदस्य स्वतंत्ररित्या किंवा नगरपरिषद एकत्रित हा दैनिक खर्च करू शकतील. हा दैनिक खर्च नगरपरिषदेने उपविधीमध्ये विहित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त अनुज्ञेय राहणार नाही.

**ग.** सदर अभ्यास दौऱ्याचे नियोजन करताना नामांकित ट्रॅवल कंपनी चे तुलनात्मक दरपत्रके मागवून सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात यावी.

**घ.** सदर अभ्यास दौऱ्यासाठी सदस्याच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस मुभा देण्यात येवू नये. (उदा.मित्र, नातेवाईक इत्यादी)

## ४. इतर बाबी

अभ्यास दौरा करताना वरील अटीं व्यतिरिक्त खालील अटींचे सुद्धा पालन करणे आवश्यक राहील.

**अ.** भेट द्यावयाच्या नागरी स्थानीक स्वराज संस्थेकडून अभ्यास गटातील सदस्यांच्या चहापान खर्चाव्यतिरिक्त इतर कोणताही खर्च करणे अनुज्ञेय राहणार नाही.

**ब.** नगरपरिषदेच्या सदस्यांच्या वतीने करण्यात आलेल्या अभ्यासदौऱ्याची लेखी टिपणी व त्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजना या दौरा पूर्ण झालेनंतर येणाऱ्या नगरपरिषदेच्या सभेपुढे सादर करून संबंधित नगरपरिषद भेटी अंती नगरपरिषद कोणत्या सुधारणा करू इच्छिते त्याबाबत सर्वंकष विचार करून निर्णय घेणे आवश्यक राहील.

**५.** मागील तीन वर्षात उच्च गुणानुक्रमे आलेल्या व वैशिष्टयपूर्ण प्रकल्प असलेल्या भेट देण्यासाठी नगरी स्थानिक स्वराज्य संस्थांची व प्रकल्पाची यादी प्रादेशिक उपायुक्त व सर्व जिल्हा सह आयुक्त यांनी एकत्रितरीत्या विभागाकरिता प्रसिद्ध करावी.

वैशिष्टयपूर्ण प्रकल्पाची निवड करताना प्राधान्याने –

**अ.** मलनिस्सारण प्रकल्प (भुयारी गटार योजना)

**आ.** घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प

**इ.** उद्याने विकसित करणे

यांचा समावेश करावा.

**६.** वरील प्रमाणे नगरपरिषद पदाधिकारी व अधिकारी यांना अभ्यास दौऱ्यासाठी संचालनालयाच्या परवानगीची आवश्यकता राहणार नाही मात्र वरील अटी शिथिल करण्याबाबत संचालनालयाच्या पूर्व मान्यतेची आवश्यकता राहिल.

Signed by
Manoj Vijay Ranade
Date: 15-10-2024 17:53:22

**(मनोज रानडे भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा संचालक**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई**

**प्रत माहितीसाठी अग्रेषित :**

१) मा. प्रधान सचिव (2), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक ,नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व).
३) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा , महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.
४) सह संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, सर्व विभाग.
५) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई (सर्व कार्यासन).
६) निवड नस्ती.

**प्रति,**

१) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालये (सर्व).
२) अध्यक्ष/ प्रशासक ,नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व).
३) मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत (सर्व)